RNI No. MAHBIL/2009/35827

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## भाग दोन-संकीर्ण सूचना व जाहिराती

वर्ष ६, अंक ३६] गुरुवार ते बुधवार, ऑक्टोबर २९-नोव्हेंबर ४, २०२०/कार्तिक ७-१३, शके १९४२ [पृष्ठे ८, किंमत : रुपये १५.००

## प्राधिकृत प्रकाशन

## संकीर्ण सूचना व जाहिराती

**Serial No. M 2027**

**FORM No. 155**

[*See* rule 329]

(MEMBERS VOLUNTARY WINDING UP)

**TAXILA HOSPITALS PRIVATE LIMITED**

REGISTERED OFFICE : Plot No. 49 Prabhat Colony, Nari Road,

Teka Naka, Nagpur 400 026, Maharashtra

CIN : U85110MH2003PTC140921

**Notice convening final meeting**

Notice is hereby given in pursuance of Section 497 of Companies Act, 1956 that a General Meeting of Members of the abovenamed Company will be held on Monday, the 7th December 2020 at 12-00 p.m. at Registered Office of the Company at Plot No. 49, Prabhat Colony, Nari Road Teka Naka, Nagpur-400 026, Maharashtra for the purpose of having an account laid before them showing the manner in which winding up has been conducted and the property of the Company disposed of and of hearing any explanation that may be given by the liquidator and also of determining by a Special Resoulation the Company the manner in which the books, accounts and documents of the Company and of Liquidator shall be disposed of.

Signature of the Liquidator.

dated : 20th October 2020.

**विशेष वसुली अधिकारी व विक्री अधिकारी पिपल्स को-ऑपरेटिव्ह बँक मर्या., देऊळगांवराजा, जि. बुलडाणा (महाराष्ट्र)**

**नमुना नं. १९**

**स्थावर मालमत्तेचे जप्तीबाबत नोटीस**

महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ नियम १०७(११ ड)

क्रमांक वि.व.अ./क.व./१३८/२०२०.— ज्याअर्थी, अध्यक्ष पिपल्स को-ऑपरेटिव्ह बँक मर्या., देऊळगांवराजा, जि. बुलडाणा यांनी महाराष्ट्र राज्य सह. कायदा १९६० कलम १०१ अन्वये थकीत कर्जदार सौ. लताबाई भगवान लोखंडे, रा. देऊळगांवराजा यांचे विरुद्ध रु. २,४८,३२१ व्याज २० सप्टेंबर २०१९ पासून सरचार्ज प्रो फी रु. नियमाप्रमाणेबाबत महाराष्ट्र सहकारी नियम, १९६० नियम १०१(१)(२) अन्वये वसूली प्रमाणपत्र मिळविले आहे आणि त्यांची अंमलबजावणी ऋणकोची खाली दर्शविलेली मालमत्ता विक्री करावयाची आहे.

त्याअर्थी, श्री. सौ. लताबाई भगवान लोखंडे, रा. देऊळगांवराजा, ता. देऊळगांवराजा, जि. बुलडाणा यांना अशी सुचना देण्यात येते की, खाली दर्शविलेली मालमत्ता वर निर्देशित केलेल्या रकमेबाबत जप्त केलेली आहे. तरी वरील वसूली प्रमाणपत्र मिळाल्यानंतर सदर मालमत्तेचे कोणतेही खाजगी हस्तांतरण करण्यात आले असले किंवा ती दुसऱ्याचे स्वाधीन करण्यात आली असेल किंवा तिच्यावर कोणताही भार ठेवण्यात किंवा निर्माण करण्यात आला असेल तर त्या सर्व बाबी पिपल्स को-ऑपरेटिव्ह बँक मर्या., देऊळगांवराजाचे बाबतीत रद्द होतील व निरर्थक ठरतील.

**मालमत्तेचे वर्णन**

| वसुली प्रमाणपत्र क्रमांक तारीख (१) | थकबाकीदाराचे नाव व पत्ता (२) | घर नंबर किंवा शेताचा भूमापन क्रमांक व वर्णन (३) | चतु:सीमा (४) | शेरा मालमत्तेवरील बोजा (५) |
|---|---|---|---|---|
| १५४७/१९<br>दिनांक<br>४ डिसेंबर<br>२०१९. | सौ. लताबाई भगवान लोखंडे<br>रा. त्र्यंबक नगर,<br>देऊळगांवराजा,<br>जि. बुलडाणा | न.प.दे. राजा वार्ड क्र. १२<br>मालमत्ता क्र. जुना ६७५(१)/१२<br>नविन W १२०००८०७<br>पूर्व-पश्चिम ३३ फूट<br>दक्षिण-उत्तर ३३ फूट<br>बांधकामासह घर | पुर्वेस.-आढाव याची जागा<br>पश्चिमेस.-कव्हळे यांचे घर<br>उत्तरेस.—रस्ता<br>दक्षिणेस.—कासारे यांचे घर | पिपल्स को-ऑपरेटिव्ह<br>बँक मर्या.,<br>देऊळगांवराजाचे थकीत<br>कर्जापोटी जप्त. |

पुन्हा असे सूचित करण्यात येते की, वरील येणे रक्कम व्याज व खर्च दिनांक २५ सप्टेंबर २०२० पर्यंत भरणा न झाल्यास वरील स्थावर मालमत्ता विक्रीस काढण्यात येईल.

**अरविंद दिगंबर क्षिरसागर,**
विशेष वसुली अधिकारी व विक्री अधिकारी,
पिपल्स को-ऑपरेटिव्ह बँक मर्या., देऊळगांवराजा,
जिल्हा बुलडाणा (महाराष्ट्र).

ठिकाण : देऊळगांवराजा,
दिनांत ७ सप्टेंबर २०२०.

**विशेष वसुली अधिकारी व विक्री अधिकारी पिपल्स को-ऑपरेटिव्ह बँक मर्या., देऊळगांवराजा, जि. बुलडाणा (महाराष्ट्र)**

**नमुना नं. १९**

**स्थावर मालमत्तेचे जप्तीबाबत नोटीस**

महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ नियम १०७(११ ड)

क्रमांक वि.व.अ./क.व./१३९/२०२०.— ज्याअर्थी, अध्यक्ष पिपल्स को-ऑपरेटिव्ह बँक मर्या., देऊळगांवराजा, जि. बुलडाणा यांनी महाराष्ट्र राज्य सह. कायदा १९६० कलम १०१ अन्वये थकीत कर्जदार छत्रपती ट्रेडर्स प्रो. रामदास भानुदास म्हस्के, रा. गिरोली खुर्द यांचे विरुद्ध रु. ६,४३,२७३ दिनांक १० डिसेंबर २०१९ पासून व्याज सरचार्झ प्रो फी रु. नियमाप्रमाणेबाबत महाराष्ट्र सहकारी नियम १९६० नियम १०१(१)(२) अन्वये वसूली प्रमाणपत्र मिळविले आहे आणि त्यांची अंमलबजावणी ऋणकोची खाली दर्शविलेली मालमत्ता विक्री करावयाची आहे.

त्याअर्थी, श्री. रामदास भानुदास म्हस्के, रा. गिरोली खुर्द, ता. देऊळगांवराजा, जि. बुलडाणा यांना अशी सुचना देण्यात येते की, खाली दर्शविलेली मालमत्ता वर निर्देशित केलेल्या रकमेबाबत जप्त केलेली आहे. तरी वरील वसूली प्रमाणपत्र मिळाल्यानंतर सदर मालमत्तेचे कोणतेही खाजगी हस्तांतरण करण्यात आले असले किंवा ती दुसऱ्याचे स्वाधीन करण्यात आली असेल किंवा तिच्यावर कोणताही भार ठेवण्यात किंवा निर्माण करण्यात आला असेल तर त्या सर्व बाबी पिपल्स को-ऑपरेटिव्ह बँक मर्या., देऊळगांवराजा, चे बाबतीत रद्द होतील व निरर्थक ठरतील.

**मालमत्तेचे वर्णन**

| वसुली प्रमाणपत्र क्रमांक तारीख | थकबाकीदाराचे नाव व पत्ता | घर नंबर किंवा शेताचा भूमापन क्रमांक व वर्णन | चतु:सीमा | शेरा मालमत्तेवरील बोजा |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| ३४४<br>दिनांक २५ फेब्रुवारी २०२०.<br>रु. ६,४३,२७३ | छत्रपती ट्रेडर्स प्रो.<br>रामदास भानुदास म्हस्के,<br>रा. गिरोली खुर्द,<br>ता. देऊळगांवराजा,<br>जि. बुलडाणा. | ग्रा.पं. गिरोली खुर्द<br>वार्ड क्र. ०१, मालमत्ता क्र. ७९<br>पूर्व-पश्चिम ३२ फूट<br>दक्षिण-उत्तर ३० फूट<br>पूर्ण बांधकामासह इमला | पुर्वेस.–पांडूरंग भाऊराव म्हस्के<br>पश्चिमेस.–रामकिसन भाऊराव म्हस्के<br>उत्तरेस.—चौक<br>दक्षिणेस.—बोळ | पिपल्स को-ऑपरेटिव्ह बँक मर्या., देऊळगांवराजाचे थकीत कर्जापोटी जप्त. |

पुन्हा असे सूचित करण्यात येते की, वरील येणे रक्कम व्याज व खर्च दिनांक ३० सप्टेंबर २०२० पर्यंत भरणा न झाल्यास वरील स्थावर मालमत्ता विक्रीस काढण्यात येईल.

**अरविंद दिगंबर क्षिरसागर,**
विशेष वसुली अधिकारी व विक्री अधिकारी,
पिपल्स को-ऑपरेटिव्ह बँक मर्या., देऊळगांवराजा,
जिल्हा बुलडाणा (महाराष्ट्र).

ठिकाण : देऊळगांवराजा,
दिनांत १५ सप्टेंबर २०२०.

**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय जळगाव विभाग, जळगाव**

**चौकशीची जाहीर नोटीस**

जा.क्र./DYCC/1495/2020

अर्ज क्र. ६२३/२०२०(एफ-९९)

(सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, सन १९५० कलम ७९-अे अे)

**सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था**.—आदर्श एज्युकेशन सोसायटी, भुसावळ, ता. भुसावळ, जि, जळगाव या न्यासासंबंधी गोकुलदास हुंडोमल कारडा, रा, भुसावळ याने न्यासाच्या परिशिष्ट एकची पुनर्रचना करणेसाठी कलम ७९-अे अे अन्वये भरलेला नमुना

ज्याअर्थी, गोकुलदास हुंडोमल कारडा, रा. भुसावळ यांनी आदर्श एज्युकेशन सोसायटी, भुसावळ, ता. भुसावळ, पी टी आर नं. एफ-९९/जळगाव या न्यासाचे संबंधीत केलेला अर्ज, या न्यासाचे संबंधीत लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, धर्मादाय उप आयुक्त, जळगाव विभाग, जळगाव यांचेकडे महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, सन १९५० चे कलम ७९-अे अे अन्वये न्यासांच्या परिशिष्ट एकची पुनर्रचना करणेसाठी या कार्यालयाकडे अर्ज सादर केलेला आहे.

ज्याअर्थी, तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, वरील न्यासाचे विश्वस्त नेमणुकीसंदर्भत कोणाचीही हरकत असल्यास सदर हरकत मे. धर्मादाय उप आयुक्त, जळगाव विभाग, जळगाव यांचे कोर्टात सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत या कार्यालयात नोंदवाव्यात किंवा या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने टपालाने पाठवाव्यात, सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अथवा प्राप्त न झाल्यास मुदतीनंतर आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही. सदर अर्जाची चौकशी/सुनावणी पुर्ण करण्यात येऊन निर्णय दिला जाईल याची नोंद घ्यावी. कळावे ही चोकशीची जाहीर नोटीस.

आज दिनांक १६ माहे सप्टेंबर २०२० रोजी माझ्या सहीनिशी व मा. उप धर्मदाय आयुक्त जळगाव यांचे शिक्क्यानिशी दिली.

**अधीक्षक (न्याय शाखा)**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
जळगाव विभाग, जळगाव.

## झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण

(महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१-बी) अंतर्गत)

## सूचना

क्रमांक झोपुप्रा/उसनंर/फेरबदल/जेरेमिहाय सह. संस्था/मोहीली/कुर्ला/२०२०/२५९, दिनांक २२ ऑक्टोबर २०२०.—ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभागाने त्यांच्या दिनांक ८ मे २०१८ ची अधिसूचना क्रमांक टिपीबी. ४३१७/६२९/सीआर/प्र.क्र.-११८/२०१७/वि.यो./नवि-११, अन्वये बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या, " एल " विभागाच्या सुधारीत प्रारूप विकास योजनेस महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३१(१) अन्वये मंजुरी दिलेली असून ती विकास योजना दिनांक ८ मे २०१८ पासून अंमलात आली आहे. (यापुढे " उक्त विकास योजना " असे संबोधण्यात येईल.)

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभागाकडील अधिसूचना क्रमांक टिपीबी-४३१७/६२९/सीआर-११८ (III)/२०१७/नवि-११, दिनांक १२ नोव्हेंबर २००८ शुद्धीपत्रकान्वये बृहन्मुंबई महानगरपालिका विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली मंजुर झालेली असून ती दिनांक १३ नोव्हेंबर २०१८ पासून अंमलात आलेली आहे. (यापुढे " उक्त नियमावली " असे संबोधण्यात येईल.)

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाच्या गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभागाने १६ डिसेंबर १९९५ च्या अधिसूचना क्रमांक झोपुयो १०९५/प्र.क्र. ३७/गृहनिर्माण सेल, अन्वये महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ मधील कलम ३(अ) मधील तरतुदीच्या अधिन राहून " झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाची " नियुक्ती केली आहे. (ज्याला यापुढे " उक्त प्राधिकरण " असे संबोधण्यात येईल.)

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना (सुधारणा) अधिनियम १९९५ मधील, प्रकरण तीन अनुसार महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ मध्ये सुधारणा करण्यात आली असून (यापुढे " उक्त अधिनियम " असे संबोधण्यात येईल.) उक्त अधिनियमातील कलम २(१९) (बी) नुसार उक्त प्राधिकरणास बृहन्मुंबई क्षेत्रात झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्याकरिता सदर अधिनियमात अभिप्रेत असणारा नियोजन प्राधिकरणाचा दर्जा दिलेला आहे आणि सदर अधिनियमातील कलम ३७(१-ब) अन्वये फेरबदल करण्यासंबंधीचा प्रस्ताव तयार करून शासनास सादर करण्याचा अधिकार उक्त प्राधिकरणास प्रदान करण्यात आला आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त प्राधिकरणाचा ठराव क्र. ५/६/४, दिनांक २८ ऑगस्ट, १९९७ अन्वये मुख्य कार्यकारी अधिकारी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांना उक्त अधिनियमाच्या कलम ३७(१-बी) खालील तरतूदीनुसार जनतेकडून सूचना/हरकती मागविण्याकरिता प्राधिकृत करण्यात आले आहे. आणि झोपडपट्टी पुनर्वसन योजनेअंतर्गत/झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्रांतर्गत/घोषित झोपडपट्टी क्षेत्रात/झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या कार्यक्षेत्रात, महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१-बी) व इतर योग्य त्या कलमाखाली मुंबई विकास आराखड्यात आवश्यकतेनुसार फेरबदल, सुधारणा इत्यादी करण्याचे प्रस्ताव मांडण्याचे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे अधिकार, मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांना प्राधिकरणाच्या दिनांक ७ जून २००४ रोजीच्या बैठकीत बाब टिप्पणी क्र. १२.६ अन्वये प्रदान करण्यात आलेले आहेत.

आणि ज्याअर्थी, मौजे मोहिली, ता. कुर्ला, जिल्हा मुंबई उपनगर " एल " विभाग येथील नगर भूमापन क्रमांक ३४ ते ४१, ४६, ४६/१, ४७, ४८, ४८/१, ५५ व ५६ (ज्याला यापुढे " उक्त जमीन " असे संबोधण्यात येईल.) हे गणनाकृत झोपडपट्टी वसाहत असून ती जेरेमियाह सहकारी गृह निर्माण संस्था या नावाची झोपडपट्टी म्हणून ओळखली जाते (ज्याला यापुढे " उक्त झोपडपट्टी " असे संबोधण्यात येईल.)

आणि ज्याअर्थी, सदर झोपडपट्टी क्षेत्रातील झोपडपट्टीवासीयांनी त्यांच्या जेरेमियाह सहकारी गृहनिर्माण संस्था स्थापन करण्याचे प्रस्ताविले असून सदर जमिनीचा विकास झोपडपट्टी पुनर्वसन योजनेअंतर्गत विकास नियंत्रण नियमावलीतील नियम क्र. (वेळोवेळी सुधारीत झाल्याप्रमाणे) ३३(१०) च्या तरतुदीनुसार करण्याचे प्रस्तावित केले आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त जमीनीवर बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्राच्या, " एल " विभागातील विकास योजनेमध्ये " बगीचा/पार्क (ROS १.५) " हा विकास योजना प्रस्ताव मंजूर केलेला असून भारतीय विमान पतन प्राधिकरण यांच्याकडील दिनांक ८ मार्च २०१९ रोजीच्या ना-हरकत प्रमाणपत्रानुसार उक्त जमीनीवर सुमारे ४२.५९ मी. इतक्या उंचीचेच बांधकाम अनुज्ञेय होत असल्याने व सदर उंची झोपडपट्टी पुनर्वसन योजनेचा विकास करण्यास पुरेशी होत नसल्याने, आणि विद्यमान झोपडपट्टीची धनता सुद्धा जास्तीची आहे. त्यामुळे उक्त झोपडपट्टी पुनर्वसन योजनेची अमंलबजावणी करणे कठीण होत आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त नियमावलीतील नियम क्र. ३३(१०) च्या उप-नियम १.३ मधील तरतुदींस अनुसरून उक्त झोपडपट्टीतील झोपडपट्टीवासीयांचा त्याच ठिकाणी पुनर्वसनाचा हक्क कायम करण्यासाठी, उक्त विकास योजनेच्या " एल " विभागातील उक्त जमीनीवरील, उक्त विकास योजनेत, " बगीचा/पार्क (ROS १.५) " हे आरक्षण वगळून ते " भागशः रिहॅबीलीटेशन ॲन्ड रिसेटलमेंट (RR २.१) व भागशः बगीचा/पार्क (ROS १.५) " या आरक्षणामध्ये समाविष्ट करण्याबाबत प्रस्तावित करणे उक्त प्राधिकरणास आवश्यक वाटते. (ज्याला यापुढे " उक्त फेरबदल " असे संबोधण्यात येईल.)

आणि ज्याअर्थी, आता उक्त प्राधिकरण, उक्त अधिनियमाच्या कलम ३७(१-ब) मधील तरतुदी अन्वये खाली नमूद केलेल्या उक्त फेरबदलावर जनतेकडून, ही सूचना **महाराष्ट्र शासन राजपत्रात** प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत सूचना/हरकती मागवित आहे.

**प्रस्तावित फेरबदल**

उक्त विकास योजनेच्या " एल " विभागातील उक्त जमिनीवरील, " बगीचा/पार्क (ROS १.५) " हे आरक्षण वगळून ते " भागशः रिहॅबीलीटेशन ॲन्ड रिसेटलमेंट (RR २.१.) व भागशः बगीचा/पार्क (ROS १.५) " या आरक्षणामध्ये समाविष्ट करण्याबाबत प्रस्तावित करण्यात येत आहे.

उक्त फेरबदल दर्शविणारा नकाशा (१) विभाग अधिकारी " एल " विभाग यांचे कार्यालय, मुंबई महानगरपालिका, (२) प्रमुख अभियंता, विकास नियोजन मुंबई महानगरपालिका मुख्यालय, ४था माळा, मुंबई, (३) मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, ५वा माळा, गृहनिर्माण भवन, बांद्रा (पूर्व), मुंबई, (४) उप संचालक, नगररचना, बृहन्मुंबई, एन्साहटमेंट्स, आझाद मैदान, मुंबई आणि (५) अतिरिक्त जिल्हाधिकारी (अतिक्रमण), जुने मुंबई यांच्या कार्यालयात उपलब्ध असून कार्यालयीन वेळेत पाहता येईल.

या संदर्भात काही सूचना/हरकती असतील तर त्या लेखी स्वरुपात मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, प्रशासकिय इमारत, अनंत काणेकर मार्ग, बांद्रा (पूर्व), मुंबई ४०० ०५१ यांच्या कार्यालयात सदर अधिसूचना प्रकाशित झाल्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत सादर कराव्यात त्यानंतर प्राप्त झालेल्या सुचना/हरकतीचा विचार केला जाणार नाही.

**सतिश लोखंडे,**
मुख्य कार्यकारी अधिकारी,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण.

वांद्रे (पुर्व), मुंबई,
दिनांक २० ऑक्टोबर २०२०.

# SLUM REHABILITATION AUTHORITY

(Under section 37(1-B) of the Maharashtra Regional and Town Planning Act 1966).

No. SRA/DDTP/Modification/Jermiha CHS/Mohili/Kurla/2020/ 259, dated 22nd October 2020.—Whereas, the Development plan of "L" Ward of Greater Mumbai, (hereinafter referred to as " the said Development Plan ") has been sanctioned by Government of Maharashtra *vide* Urban Development Department's Notification No. TPB-4317/629/CR-Pra.Kru./118/2017/UD-11, dated 8th May 2018 under section 31(1) of the Maharashtra Regional and Town Planning Act,1966 and which has come into force with effect from dated 8th May 2018 (hereinafter referred to as " the said Development Plan ")

And Whereas, the Development Control and Promotion Regulations for Development Plan for Greater Mumbai have been sanctioned by Government of Maharashtra *vide* Urban Development Department's Corrigendum No. TPB-4317/629/CR118(III)/2017/UD-11, dated 12th November 2018 and which has come into force with effect from dated 13th November 2018 (hereinafter referred to as " the said regulation ")

And Whereas, the Government of Maharashtra *vide* Notification of Housing and Special Assistance Department No. SRP-1095/CR-37/ Housing Cell, dated 16th December 1995 has appointed " Slum Rehabilitation Authority " (herein after referred to as " the said Authority ") under the provisions of section 3(A) of the Maharashtra Slum Areas (Improvement, Clearance and Redevelopment) Act, 1971 for all the Slum Rehabilitation Areas within the territorial limits of Greater Mumbai (hereinafter referred to as " the said Authority ")

And Whereas, according to the provisions of Chapter-III section No. 2(19)(*b*) of the Maharashtra Regional and Town Planning (Amendment) Act 1995, the said Authority has been declared to be the Planning Authority for the purpose of implementation of Slum Rehabilitation Scheme in Greater Mumbai and has been empowered to initiate modification to the sanctioned Development Plan of Greater Mumbai Municipal Corporation under the provisions of sub section (*1B*) of section 37 of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (hereinafter referred to as " the said Act ") and to submit the same to State Government for approval.

And Whereas, *vide* resolution No. 5/6/4, dated 28th August 1997, the said Authority has empowered and authorized the Chief Executive Officer, Slum Rehabilitation Authority to call for objection and suggestion as stipulated under section 37(1-B) of the said Act.

And Whereas, in Slum Rehabilitation Scheme/ Slum Rehabilitation Area/Declared Slum Area and in Jurisdiction of Slum Rehabilitation Authority in other Area of Greater Mumbai *vide* Resolution No. 12.6, dated 7th June 2004, the said Authority has empowered and authorized the Chief Executive Officer, Slum Rehabilitation Authority to submit proposal under section 37(1-B) or any other section of the said Act.

And Whereas, the lands bearing CTS No. 34 to 41, 46, 46/1, 47, 48, 48/1, 55 and 56 of Village Mohili, Tal. Kurla, Dist. Mumbai suburban, Ward "L" (hereinafter referred to as " the said land ") are Censused Slum Areas and this Slum is popularly Known as Jeremiha Co-operative Housing Society (hereinafter referred to as " the said Slum ")

And Whereas, the slum dwellers of said slum have proposed to form their Co-operative Housing Society Known as Jeremiha Co-operative Housing Society and accordingly proposed redevelopment of the said land by implementing Slum Rehabilitation Scheme as per the provision of the section 33(10) of the said regulation

And Whereas, in the said Development plan of "L" Ward of Greater Mumbai Municipal Corporation, Reservation of Garden/park (ROS 1.5) is sanctioned on the said land and as per the No Objection Certificate, dated 8th March 2019 of Airports Authority of India, maximum

permissible height of the structure in the said land is upto 42.59 mtr. and same height is not sufficient for the development of Slum Rehabilitation Scheme in the said land and existing density of said Slum is also very high, thereby causing hardship in implementation of slum Rehabilitation Scheme of said Slum.

And Whereas in order to uphold the right of all eligible slum dwellers for in-situ Rehabilitation as per contents of sub clause 1.3 under section 33(10) of said regulations, the said Authority finds it necessary to propose reservation of " Garden/Park (ROS 1.5) " shown on said land is to be deleted and included in resrevation of partly " Rehabilitation and Resettlement (RR2.1) " and partly " Garden/Park (ROS 1.5) " in said Development Plan. (hereinafter referred to as " the said modification ")

Now therefore, as per the provisions of section 37(1-B) of the said Act, the said Authority invites suggestions and objections from the public on the said modification within a period of 30 days from the date of publication of this notice in the *Official Gazette.*

PROPOSED MODIFICATION

**In the said Development plan of "L" ward, reservation of Garden/Park (ROS 1.5) shown on said land is proposed to be deleted and included in reservation of partly " Rehabilitation and Resettlement (RR2.1) " and partly " Garden/Park (ROS 1.5) ".**

Copy of the plan showing the said modification in red color is available for inspection in the office of the said Authority and also in office of the Ward Office "L" Ward, Mumbai Municipal Corporation Chief Engineer, Development Plan, Mumbai Municipal Corporation, 4th Floor, Head Office, Mumbai: Chief Executive Officer, Slum Rehabilitation Authority, 5th Floor, Girah Nirman Bhavan, Bandra (East), Mumbai; Deputy Director of Town Planning, Greater Mumbai, ENSA Hutments, Azad Maidan, Mumbai, Additional Collector (ENC), Old Custom House, Mumbai.

Any suggestions / Objections to the said proposed modification shall be sent to the Chief Executive Officer, Slum Rehabilitation Authority, Administrative Building, Anant Kanekar Marg, Bandara (East), Mumbai- 400 051 within 30 days from the publication of this notice in the *Official Gazette* Suggestions/Objections received after prescribed time limit shall not be considered.

SATISH LOKHANDE,
Chief Executive Officer,
Slum Rehabilitation Authority.

Bandra (E), Mumbai.
dated : 20th October 2020.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.